# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये महात्मा फुले यांच्या जीवन चरित्रावर व्याख्यान संपन्न

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये महात्मा फुले स्थापित सत्यशोधक समाजाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने “महात्मा फुले यांचे जीवनचरित्र व वर्तमान समाजमन” या विषयावर दि. 24/11/2022 रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतिशकुमार देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणुन माऊली महाविद्यालय वडाळा येथील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते. तर अध्यक्ष म्हणुन जैवंतत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. किरण जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. गौतम जाधव यांनी केले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रमोद पाटील यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार सांगत फुले यांचे सामाजिक जडण-घडणीमधील योगदान महत्वाचे असल्याचे नमुद केले तसेच महात्मा फुले यांचे विचार सदैव प्रेरणादायी असुन, आपल्या सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. किरण जगताप यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये सर्व महापुरुषांचे विचार प्रेरणादायी असुन, आपण सर्वांनी महापुरुषांचे जीवनचरित्र वाचण्याचे गरज असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. स्नेहा हगरगुंडगी यांनी केले तर आभार प्रदर्शन क्रिडा शिक्षक प्रा. गोकुळ यादव यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. कविता संभारम, प्रा. भारती जाधव, प्रा. सुजाता देवकर, प्रा. शीतल भोजने, प्रा. स्नेहल मठे, लिपीक अर्चना गाडेकर आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.












Lokmangal Science & Entrepreneurship Wadala.

Principal
Lokmangal Science &
Entrepreneurship College, Wadala

Scanned with Oken Scanner